मराठी साहित्य मंडळ, कलबुरगी (गुलबर्गा)
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

वर्ष : ८ अंक : ४

आषाढ, श्रावण, भाद्रपद शके १९४४
जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर २०२२

---

मानद संपादक : श्री. पवनकुमार देशपांडे
कार्यकारी संपादक : श्री. सर्वोत्तम सताळकर
निवास (०८४७२) २५५८७८ / ०९२४२१९३७९२

संपादक मंडळ

श्री. विद्याधर मुरुगकर ★ श्री. व्यंकटेश वळसंगकर
सौ. वंदना किणीकर ★ सौ. शीतल देऊळगावकर
डॉ. योगेश्वर देशपांडे

---

**संस्थेचा पत्ता : मराठी साहित्य मंडळ**, स्टेशन बाजार,
गुलबर्गा (कलबुर्गी) ५८५१०२.
दूरभाष : कार्या. (०८४७२) २३२२०७ email-s.satalkar@yahoo.com
वेळ : सकाळी ८ ते ११ व सायं. ५ ते ८. गुरुवारी साप्ताहिक सुट्टी.

---

या अंकाचे मूल्य : रु. ५०/-
वार्षिक वर्गणी - वैयक्तिक रु. ३००/-, संस्थेसाठी रु. ४००/-
वर्गणी कुठल्याही महिन्यापासून चेक, डीडी अथवा मनीऑर्डरच्या माध्यमाने
'Editor Anubandh' या नावाने पाठवावी.

( संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार, अभिप्रायार्थ भेट पुस्तके, नियतकालिके, प्रसिद्धीसाठी साहित्य इ. कार्यकारी संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावे. प्रसिद्धीसाठी साहित्य ईमेल वरही पाठविता येईल. या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. )

# अंतरंग.....


- संपादकीय..... ३
- काळेकरडे स्ट्रोक्स : एक उदास पोकळी / डॉ. सुधीर ब. मोरे ६
- गुजराती दलित कथाकार प्रवीण गढवी यांच्या कथेतील जीवन संघर्ष / अमोल सुभाष कवडे १५
- कृष्णात खोतांची कादंबरी / डॉ. वैशाली श्रीकृष्ण भालसिंग २१
- राहीच्या स्वप्नांचा उलगडा / डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात ४०
- दोष ना कुणाचा ! (कथा) / राधिका शाम घोगले ४६
- संत कान्होपात्रा : जीवन चरित्र / गौरी सकुंडे ५२
- श्री चारधाम यात्रा/ अनुप्रिता सताळकर ५९
- म. फुले यांच्या काव्यातील शैक्षणिक विचार / दत्ता सरगर ६८
- युगान्त - एक अलौकिक पुस्तक / हरी अग्निहोत्री ७४
- कविता.... कविता.... कविता.... कविता.... ७६
- 'चित्रब्रम्ह' पुटण्णा कणगल / सर्वोत्तम सताळकर ७९
- कैलास लेण्यातील कथापर शिल्पपट / डॉ. चैतन्य शिनखेडे ८६
- मंडळाची वाटचाल..... ९४

# गुजराती दलित कथाकार प्रवीण गढवी यांच्या कथेतील जीवन संघर्ष

● अमोल सुभाष कवडे

**प्रस्तावना**

गुजराती साहित्यामध्ये प्रवीण गढवी यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. कथाकार, कवी, समीक्षक म्हणून त्यांची गुजराती साहित्यामध्ये ओळख आहे. प्रशासकीय सेवेत नोकरी करणारे प्रवीण गढवी यांनी गुजराती साहित्यामध्ये विपुल प्रमाणात लेखन केले आहे. त्यांचे एकूण पाच कथासंग्रह, सहा कवितासंग्रह, समीक्षात्मक ग्रंथ, तसेच संपादित लेखन अशा स्वरूपाची ग्रंथसंपदा आहे. तसेच गुजराती दलित साहित्यातील महत्त्वाचे कथाकार म्हणून त्यांची ओळख आहे. प्रशासकीय सेवेत असताना त्यांनी सर्वसामान्य लोकांच्या, दलितांच्या समस्या जवळून पहिल्या होत्या, शिवाय त्यांचे बालपण दलित वस्तीमध्ये गेल्याने त्याचाही परिणाम त्यांच्या लेखनावर झाल्याचे दिसून येते. प्रवीण गढवी यांच्या कथांच्या संख्येचा, विषयाचा व आशयाचा आवाका मोठा असल्याने काही मोजक्या कथांच्या आधारे त्यांच्या कथेतून व्यक्त झालेल्या जीवन संघर्षाचा शोध या ठिकाणी घेण्यात आलेला आहे.

**प्रवीण गढवी यांच्या कथेतील जीवन संघर्ष**

प्रवीण गढवी यांनी एकूण पाच कथासंग्रह लिहिलेले आहेत. त्यामध्ये 'अंतरव्यथा', 'मलाका', 'प्रतीक्षा', 'सुरजपंखी' आणि 'स्वर्ग उपर मनुष्य' यांचा समावेश होतो. यामध्ये त्यांनी वेगवेगळ्या विषयांवर कथालेखन केले आहे. प्रवीण गढवी यांच्या कथेतील माणसे निमूटपणे अन्याय सहन करताना दिसतात. स्त्रिया उदरनिर्वाह करण्यासाठी स्वतःला विकतात, तर प्रस्थापित समाज त्यांचे वेगवेगळ्या प्रकारे शोषण करताना दिसतो. त्यामुळे जीवन जगण्यासाठी, कुटुंबासाठी प्रवीण गढवी यांच्या कथेतील माणसांना मोठ्या प्रमाणत जीवन संघर्ष करावा लागतो.

'मरद कसु बल रंग चढे' ही प्रवीण गढवी यांची दलित कथा गुजराती

दलित समाजाच्या जीवनसंघर्षावर भाष्य करते. राजदरबारातील बाबुजीकडून दलित समाजातील दुदाच्या मुलीवर लैंगिक अत्याचार होतो आणि त्यातून दुदाची मुलगी गरोदर राहते. त्यामुळे संतापलेला दुदा बाबुजीच्या विरुद्ध बंड करतो. दुदाच्या या कृत्याचा राग आल्याने दुदाला मारण्यासाठी उच्चवर्गीय समाज लहान मुलांसह एकवटला जातो. याउलट दलित समाज मात्र दुदाच्या पाठीशी खंबीरपणे उभे न राहता आपण कसे खालच्या पातळीवरचे आहोत हे पटवून देतो आणि 'हलक्या जातीच्या मुली हलक्याच असतात' हे सांगून एकप्रकारे अन्यायाचे समर्थन करतो. प्रस्थापित सवर्ण समाजाला विरोध केला असता आपल्याला या गावात जगणे मुश्कील होईल, ही भीती त्यांच्या मनात निर्माण होते आणि जीवन जगण्यासाठी तडजोड करण्यात समाधान मानले जाते. 'अंतरव्यथा' या कथेत नाथालालची पत्नी पाणी भरत असताना गारसियांना झालेला विटाळ आणि त्यामधून तिला कायमचे मातृत्वास मुकावे लागणे यांसारखा संवेदनशील प्रसंग अस्पृश्यांचे भयानक दुःख सांगून जातो. तर अस्पृश्यांच्या मुलांच्या शिक्षणाच्या व्यथा सांगताना नाथालाल म्हणतो की, 'अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी शासनामार्फत सोयीसुविधा देण्यात आल्या; परंतु तरीदेखील ते आपल्या मुलांना शिक्षण देऊ शकत नाहीत, कारण अस्पृश्यांचा मुख्य प्रश्न हा भूक असल्याने लहान लहान मुलांना मजुरीवर जावे लागते. त्यामुळे दलितांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते.'

गावामध्ये अस्पृश्यांचे केस कापले जात नाहीत, कपडे शिवले जात नाहीत त्यामुळे लोकांना वेगवेगळ्या प्रकारचा संघर्ष करावा लागतो. त्यासंबंधीच्या प्रसंगाचे वर्णन करताना 'अणु' या कथेत प्रवीण गढवी म्हणतात की, 'गावाकडे आलेला शहरातील सुशिक्षित तरुण केस कापण्यासाठी सलूनमध्ये गेल्यानंतर अधिक चौकशी केली असता तो तरुण अस्पृश्य आहे असे समजते तेव्हा दुकानदार त्याचे केस कापणे अर्ध्यावर थांबवतो.' त्यावेळी तो तरुण घरी येऊन आपल्या वडिलांना सांगतो की, ''जातीभेद करणे हा कायद्याने गुन्हा आहे. त्यामुळे मी पोलिसांकडे तक्रार करणार आहे.'' यावर त्याचे वडील म्हणतात, ''कायदा फक्त पुस्तकात असतो, आपली तक्रार कोण घेणार ?'' संविधानाला मानणारा दलित तरुण आणि संविधानाची मर्यादा सांगणारे वडील यांच्यातील द्वंद्व यामधून दिसून येते.

हजारो वर्षे अन्याय, अत्याचार यामुळे पीडित असणाऱ्या दलित समाजाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे न्याय मिळाला आणि नोकरीच्या

संधी निर्माण झाल्या. त्यामुळे कित्येक दलित तरुण क्लास वन अधिकारी झाले. असे असले तरी त्यांच्या जगण्यातील संघर्ष संपलेला नाही, हे प्रवीण गढवी यांच्या 'जी साहेब' या कथेतून सांगितले आहे. प्रस्तुत कथेचा नायक जेव्हा म्युनिसिपालटीच्या शाळेत दाखल झाला, तेव्हापासून त्याला 'तू हरिजन' म्हणून हिणवले जात होते, त्याच्या जवळ कोणी बसत नव्हते. इतकेच नाही, तर शिक्षक देखील त्याची चौकशी करत नव्हते. जेवण करताना त्याला मिसळून घेतले जात नव्हते त्यामुळे एकट्यानेच जेवण करणे अशा प्रकारची वागणूक लेखकाला शालेय शिक्षण घेत असताना मिळाली. सगळे अहमदाबाद शहर उजेडात असताना नायकाच्या घरी मात्र रॉकेलचा दिवा जळत असे. त्यामुळे त्याला रस्त्यावरील लाईटच्या दिव्याखाली अभ्यास करावा लागला. अस्पृश्य असल्याने कॉलेजच्या निवडणुकीमध्येपण त्याच्या मताला कोणी महत्त्व देत नाही, त्याला गृहीत धरले जात नाही. कमी मार्क असूनदेखील विज्ञान शाखेला प्रवेश मिळाला याचेच सर्वांना वाईट वाटते. ही परिस्थिती पाहून कथेचा नायक upsc ची तयारी करतो आणि त्यामध्ये यशस्वी होतो. आता त्याला वाटते की, आपण वर्णभेदाच्या चक्रातून सुटलो; परंतु प्रशिक्षण घेण्यासाठी जातो तेव्हा त्याला जातीयतेचे अनेक कटू अनुभव येतात. प्रशिक्षण पूर्ण करून प्रत्यक्ष कामावर हजर होतो तेव्हा ऑफिसमधील कर्मचारी 'आता आपण अस्पृश्य लोकांना साहेब म्हणायचे का ? काय जमाना आला आहे,' असे एकमेकांना म्हणतात. अस्पृश्य समाजातील एखादी व्यक्ती क्लास वन अधिकारी झाली, तरी त्याला प्रस्थापित लोकप्रतिनिधीच्या दडपणाखाली काम करावे लागते, स्वतःचे अधिकार वापरता येत नाहीत याचा प्रत्यय कथेच्या नायकाला येतो. अशा प्रकारच्या भयानक जीवनसंघर्षाचे चित्रण प्रवीण गढवी यांनी 'जी साहेब' या कथेत केले आहे.

प्रवीण गढवी यांच्या कथेतील जीवनसंघर्षावर भाष्य करणारी आणखी एक महत्त्वपूर्ण कथा म्हणजे 'घर'. प्रस्तुत कथेचा नायक गोवा आपल्या घराचे वर्णन करताना सांगतो की, आकाशाचे छप्पर हेच आमचे घर आहे कारण ढगातून कोसळणारा प्रत्येक थेंब हा आमच्या घरात येतो. इतकी भयानक अवस्था घराची झाली आहे. त्यामुळे तो म्हणतो की, गरिबांसाठी पाऊस पडला तरी दुःख आणि नाही पडला तरी दुःख, दलित समाजात कोणीच सुखी नाही. या समाजात जन्मलो तेव्हापासून पैशासोबत वैर, शिक्षणासोबत वैर, अन्नासोबत वैर, हिवाळ्यामध्ये

असणारी भयाण थंडी आणि होणारा त्रास पाहून गोवा म्हणतो की, 'एकवेळ दुष्काळ असलेला चांगला. कारण त्यामुळे हाताला सरकारी काम मिळते आणि हातात चार पैशे येतात.' शिवाय शासनाकडून आलेली घरकुल योजना पुढारी कशा प्रकारे हडप करतात, हेही दिसते. अशा प्रकारचे भयाण जीवनाचे वास्तव या ठिकाणी दिसून येते.

दलित समाज हा कोणत्याही अपेक्षा आणि स्वप्न उराशी बाळगून जीवन जगत नाही. जन्माला आलो आहे या हेतूने जीवन जगणे हेच त्याचे उद्दिष्ट असते. तरीदेखील अशा सरळ जीवन जगणाऱ्या व्यक्तीलादेखील व्यवस्थित जीवन जगता येत नाही. 'गांठाळ' या कथेत गांठाळ हा पटेल आणि गारसिया यांची आणि गावकीची कामे करणारा दलित तरुण आहे आणि त्या कामाच्या बदल्यात त्यांनी दिलेले शिळे अन्न आणि पदार्थ खाऊन स्वतःचा उदरनिर्वाह करतो. प्रस्तुत कथेत त्याच्यावर अनेक प्रकारे अन्याय होत असतो; परंतु त्याला विरोध मात्र तो करू शकत नाही. मग ती दलित समाजाची मजबुरी असो की आणखी काही कारणे असोत, दरबारी लोकांचा अन्याय निमूटपणे सहन केला जातो. शिळ्या भाकरी आणि ठेचा हेच काय ते आपले सुख, वैभव आहे एवढे साधे जीवन जगणारा, माफक अपेक्षा असणारा गांठाळ आपले जीवन जगत असतो. दरबारी लोकांना दलितांच्या स्त्रिया या आपल्या भोगवस्तू वाटतात आणि ते त्यांच्यावर हक्क गाजवतात. पोटासाठी मजबुरी असणाऱ्या दलित समाजातील स्त्रियांना दरबारी लोकांच्या शेतात मजुरीसाठी जावे लागते आणि त्याचा गैरफायदा सवर्ण लोक घेतात. गांठाळची पत्नी एक दिवस मजुरीवर गेली असता हलाजीचा मुलगा पिरुजी जीवलीवर बलात्कार करतो. कित्येक वेळा हात जोडून जीवली विनवणी करते; परंतु वासनेने पेटलेला पिरुजी तिच्यावर दया दाखवत नाही. ती घडलेला प्रसंग आपल्या नवऱ्याला गांठाळला सांगते. दरबारी लोकांना जाब विचारण्याची ताकद गांठाळमध्ये नसते, त्यामुळे झालेला प्रकार कोणाला न सांगता आपल्या दोघांच्यात ठेवण्यास तो सांगतो शिवाय आपल्या समाजातील कोणतीच स्त्री पवित्र नाही, असे सांगत तो जीवलीची समजूत घालतो. स्वातंत्र्यानंतर आजही दलित समाजाची असणारी असुरक्षिता प्रवीण गढवी यांनी सदर कथेतून चित्रित केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांना अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली; परंतु स्वतःला श्रेष्ठ समजणारे उच्चवर्णीय हे दलितांकडे अतिशय हीन नजरेने पाहतात

आणि सर्व कायदे पायदळी तुडवताना दिसतात.

भारतीय समाजात जातीयतेची मुळे किती खोलवर रुजली आहेत, याचे चित्रण प्रवीण गढवी यांच्या अनेक कथांमधून आपणास दिसून येते. आजही भारतीय समाजात जातीबाहेर रोटी बेटी व्यवहार केला जात नाही. एखाद्या तरुण-तरुणीने सामाजिक बंधने झुगारून आंतरजातीय विवाह केला तर, त्यांना अनेक प्रसंगांना तोंड द्यावे लागते, जिवंतपणी मृत्यूच्या वेदना सहन कराव्या लागतात. अशाच एका आंतरजातीय विवाहाचे आणि त्याच्या परिणामाचे चित्रण प्रवीण गढवी यांनी 'मृत-अमृत' या कथेच्या माध्यमातून केले आहे.

केतन आणि दिया हे एकाच कॉलेजमध्ये शिकणारे होते. त्यामुळे त्यांच्यात आकर्षण निर्माण होते आणि त्याचे रूपांतर प्रेमात होते: दोघेही पदवीधर होतात. दोघांच्या लग्नाला घरून विरोध असल्याने ते पळून जाऊन लग्न करतात. परिणामी दोन्ही कुटुंबांनी त्यांच्या सोबतचे संबंध कायमचे तोडून टाकले. दीपाच्या वडिलांनी तर तिला 'मेली' म्हणून सोडून दिले. आणि इथूनच त्यांच्या संघर्षाला सुरुवात झाली. दोघेही नोकरीसाठी खूप प्रयत्न करतात; परंतु नोकरी मिळत नाही. दीपा दिसायला सुंदर असल्याने तिला नोकरी देण्याच्या बदल्यात शरीरसुखाची मागणी केली जाते. परिणामी त्यांना अनेक आर्थिक संकटांचा सामना करावा लागतो. घरभाडे थकल्याने रस्त्यावर येण्याची परिस्थिती निर्माण होते. परिस्थितीसमोर हतबल झालेला, दीपावर जीवापाड प्रेम करणारा केतन यातून मार्ग काढण्यासाठी दीपाला आपल्या मित्राची शय्यासोबत करण्यास सांगतो. आंतरजातीय विवाह आणि त्यातून निर्माण झालेला जीवन संघर्ष या ठिकाणी प्रवीण गढवी यांनी टिपलेला आहे.

## समारोप

एकूणच प्रवीण गढवी यांनी वेगवेगळ्या प्रकारचा जीवन संघर्ष अनेक कथांच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे, त्यांच्या कथेतील पात्रे आपल्यावर झालेला अन्याय निमूटपणे सहन करण्यात धन्यता मानताना दिसतात. त्यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारची विद्रोहाची भावना व्यक्त होताना दिसत नाही. समाजातील दाहक परिस्थितीशी ती संघर्ष करतात, आपल्या अंतरमनातील व्यथा ती व्यक्त करतात आणि नशिबाला आलेले भोग आहेत, असे समजून जीवन जगतात.

**संदर्भ :**

१) डॉ. सोलंकी जयश्री, गुजराती टुंकी वार्तामा दलित संवेदना, फ्लेमिन्गो प्रकाशन, अहमदाबाद, प्र. आ. २०१३.

२) गढवी प्रवीण, अंतरव्यथा, गुर्जर ग्रंथरत्न कार्यालय, प्रथम आवृत्ती, १९९१.

३) गढवी प्रवीण, मलाका, अमी प्रकाशन, प्रथम आवृत्ती, २००१.

**- अमोल सुभाष कवडे**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
किसन वीर महाविद्यालय, वाई.
मोबा. : ९९२१४३३६३८
ईमेल - amol.kawade98@gmail.com

★ ★ ★

## ✽ लेखकांना आवाहन ✽

'भाव अनुबंध' त्रैमासिकासाठी मराठी साहित्यावरील लेख, ऐतिहासिक लेख, ललित लेख, कथा (स्वतंत्र तसेच अनुवादित) आणि कविता यांचे स्वागत आहे. तरी लेखकांनी विशेषत: तरुण आणि नवोदित लेखकांनी, संशोधकांनी आणि संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांचे साहित्य 'भाव अनुबंध'कडे अवश्य पाठवावे. त्याला निश्चित प्रसिद्धी दिली जाईल. आपले साहित्य सुवाच्च अक्षरात अथवा टंकलिखित स्वरूपात कागदाच्या एका बाजूला लिहिलेले असावे. साहित्य ई-मेल पत्त्यावरही पाठवता येईल.